| MHAU100011132025 | **<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९२/२०२५</u>**<br><br>***<u>( लक्ष्मीबाई रमेश चौरे वि. निरंक)</u>*** |
| --- | --- |

**<u>मध्ये निशाणी क्र.१ खालील आदेश</u>**

**०१.** अर्जदारांचे नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार यांनी अर्जामध्ये नमुद केले आहे की, मयत रमेश आनंदा चौरे यांचे दिनांक **०३/०७/२०२४** रोजी निधन झाले आहे. तसेच मयत रमेश आनंदा चौरे हे अर्जदार क्र.१ हिचे पती, अर्जदार क्र.२ चे वडील व अर्जदार क्र.३ यांचा मुलगा आहे. मयत रमेश आनंदा चौरे हे अर्जदाराचे वडील आहेत. तसेच मयत रमेश आनंदा चौरे यांचा एक मुलगा नामे अमोल रमेश चौरे यांचे दि.०२/०६/२०१९ रोजी निधन झाले आहे. तसेच मयत रमेश आनंदा चौरे यांची आई फार वर्षापूर्वी मयत झालेली असल्यामुळे अर्जदार यांच्याकडे ती मयत झाल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. तसेच अर्जदाराव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नसल्याचे नमुद केले आहे.

०३. अर्जदार यांना मयतरमेश आनंदा चौरे यांचा नावाने महिंद्र ॲण्ड महिंद्रा कंपनीची जीप चारचाकी वाहन ज्याचा नोंदणीकृत क्र.एमएच-२०/डीव्ही-७०९८ असा आहे. मयत रमेश आनंदा चौरे यांच्या निधनानंतर त्यांचा लाभ त्यांच्या वारसांना व्हावा म्हणून अर्जदार हे सदर चारचाकी वाहन हे अर्जदार क्र.१ च्या नावावर करण्यासाठी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०४. अर्जदाराने अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी अर्जदारा क्र. १ व २ यांनी साक्षीपुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.०९ व १०) अभिलेखावर दाखल केले असुन त्यांनी सदर शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुर्नउल्लेख केला आहे. मयत रमेश आनंदा चौरे यांचा एक मुलगा नामे अमोल रमेश चौरे हे मयत असून त्यांचा विवाह न झाल्याबाबत शपथपत्र दाखल

केले. तसेच अर्जदाराने त्याच्या आधारकार्डाची प्रत, मयत रमेश आनंदा चौरे व त्यांचा मयत मुलगा अमोल रमेश चौरे यांच्या मृत्यु प्रमाणपत्राच्या प्रती, वाहनाचे कागदपत्राची प्रत, इ.दस्त कागदपत्रांच्या यादीसोबत (नि.क्र.०४) अभिलेखावर दाखल केले आहेत. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र "दैनिक लोकपत्र” मध्ये दि. १० डीसेंबर २०२५ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन (नि.क्र.११)प्रसिध्द करण्यात आले, मात्र मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्याची मागणी केली आहे, अर्जदार यांनी अर्जातील कथनांचा पुर्नउल्लेख केल्याप्रमाणे अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यासाठी अन्य कुणीही आक्षेप घेतला नाही.

**०५.** वरील पुरावा व कागदपत्रांच्या आधारे अर्जदार हे मयत रमेश आनंदा चौरे यांचे मृत्यु पश्चात त्यांचे वारसदार आहेत असे दिसते. त्यांच्या पुराव्याची विश्वासार्हता बाधित होईल याचे कोणतेही कारण समोर आलेले नाही. अशा परिस्थितीत, अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे ते मयत रमेश आनंदा चौरे यांचे वारस असल्याचे दिसुन येत असल्याने ते वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असुन त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र देणे न्यायोचीत होईल, म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश करतो.

**<u>आदेश</u>**

i. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.
ii. अर्जदार हे मयत **रमेश आनंदा चौरे** यांचे वारस असल्याबाबत त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन मुद्रांक / शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.
iii. अर्जदारांनी अर्जाचा खर्च सोसावा.
iv. अर्ज निकाली काढण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2026.03.20 11:25:38 +0530

**( जी. डी. गुरनूले )**

**दिनांकः १८/०३/२०२६.** **सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खुलताबाद.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | N.D.Narwade |
| Court | : | Jt. Civil Judge, J. D. and J.M.F.C., Khultabad. |
| Date | : | 18.03.2026 |
| Order signed by the presiding officer on | : | 18.03.2026 |
| Order uploaded on | : | 20.03.2026 |